| MHBI100007802022 | **नियमीत दिवाणी दावा क्रमांक १९१/२०२२ मधील निशाणी क्र. २९ खालील आदेश** |
|---|---|

[०१] प्रस्तुत अर्ज हा वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्तीसाठी सादर केलेला आहे.

[०२] वादीने असे कथन केले आहे की प्रस्तुतचा दावा मालकी जाहीर करुन कायम मनाई हुकुम मिळणेबाबत दाखल केला असून अनावधानाने दावा दाखल करतेवेळी सदरच्या प्रकरणातील दाव्याचे कलम नं.२ मधील ओळ क्र. २ मध्ये वादग्रस्त क्षेत्र नजरचुकीने ००.०१.९१ आर ऐवजी ००.०३ असे टाईप झाले आहे. तसेच नि. ५ मधील तुर्तातुर्त मनाई हुकुमाच्या अर्जातील कलम नं.३ मधील ओळ क्र.२ मध्ये नजरचुकीने ००.०१.९१ आर ऐवजी ००.०३ आर असे टाईप करण्यात आले आहे. त्याऐवजी मुळ दाव्यामध्ये दाव्याचे कलम नं. २ मधील ओळ क्र.२ मध्ये वादग्रस्त क्षेत्र ००.०३ आर ऐवजी ००.०१.९१ आर व नि.५ वरील तुर्तातुर्त मनाई हुकुमाच्या अर्जातील कलम नं. ३ मधील ओळ क्र.२ मध्ये वादग्रस्त क्षेत्र ००.०३ आर ऐवजी ००.०१.९१ आर अशी दुरुस्ती करण्यासाठी वरनमुद मागणीसह प्रस्तुत अर्ज सादर केला.

[०३] अर्जावर म्हणणे सादर करत, प्रतिवादींच्या विद्वान वकिलांनी त्यास विरोध दर्शविला.

[०४] अर्जाच्या सुनावणीवेळी दोन्ही बाजुच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

[०५] अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०६] वादीच्या कथनानुसार दावा दाखल करतेवेळी नजरचुकीने टाईप झालेल्या क्षेत्राऐवजी मुळ दाव्यामध्ये दाव्याचे कलम नं. २ मधील ओळ क्र.२ मध्ये वादग्रस्त क्षेत्र ००.०३ आर ऐवजी ००.०१.९१ आर व नि.५ वरील तुर्तातुर्त मनाई हुकुमाच्या अर्जातील कलम नं. ३ मधील ओळ क्र.२ मध्ये वादग्रस्त क्षेत्र ००.०३ आर ऐवजी ००.०१.९१ आर अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. अर्थातच सदर दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादीला त्याबाबत त्याचे म्हणणे

दाखल करण्याची संधी मिळणार असल्यामुळे सदर प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादीचे अपरिमीत असे नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल. एकुणच वरनमुद विश्लेषणाचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

(१) प्रस्तुत अर्ज रक्कम रुपये २००/– ईतका खर्च प्रतिवादीस देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

(२) वादींनी अर्जात नमुद केल्याप्रमाणेची दुरुस्ती तात्काळ दाव्यात करण्याबाबत आदेशीत करण्यात येत आहे.

(3) प्रस्तुत अर्जाचा खर्च वादींनी सोसावा.

(४) सदरचा आदेश पीठासनावरुन उद्घोषित करण्यात आला.

Digitally signed by PRAVIN VISHWAS PATIL
Date: 2023.06.15 16:47:12 +0530

(पी.व्ही. पाटील)

दिनांक:– १५.०६.२०२३. २ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, केज.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

Dictated on : 15/06/2023

Transcribed on : 15/06/2023

Checked & signed on : 15/06/2023

Sd/-

(S.Y. Gore),
Stenographer Grade-3,
Ct. of CJJD and JMFC, Kaij.